# वस्तू व सेवा कर: स्वरूप आणि वैशिष्टये

डॉ. संजय काळे
अर्थशास्त्र विभाग, दिगंबरराव बिंदू
महाविद्यालय भोकर जि. नांदेड

**प्रस्तावना:**

[१]स्वातंत्र्यानंतर आपल्या देशातील करपध्दतीमध्ये अनेक सुधारणा झाल्या. या सर्व सुधारणामधील अत्यंत मूलगामी विचार म्हणजे वस्तू व सेवा कर लागू करण्याचा विचार. वस्तू व सेवांचा उपयोग जेथे होतो तेथे कर असावा व करावर कर लागू नये या तत्वावर आधारीत हा विचार आहे. कोणत्याही देशाच्या सरकारला राज्यकारभार करण्यासाठी महसूल लागते. महसूल मिळविण्याचे काम मुख्यात : प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कराद्वारे केले जाते. या दोन करापैकी अप्रत्यक्ष करप्रणालीतील ही दूरदृष्टीची सुधारणा आहे.[१]

[२] पूर्वीची करपध्दती अत्यंत क्लीष्ट, गुंतागुंतीची, वेळखावू व विकासप्रक्रियेमुळे वस्तू व सेवांच्या किमंतीत वाढ व अनेक करामुळे कर भरणाऱ्या घटकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. यामधुनच गैरकारभार, करचूकवेगिरी, भ्रष्टाचार, ग्राहकांना करावर कर असे परिणाम झाले, या सर्व बाबीपासून सुटका करून घेण्यासाठी **एक राष्ट्र, एक कर** ही करप्रणाली परिणामकारक आणि ग्राहक, उत्पादक व सरकार या सर्वांना न्याय देणारी ठरेल, या करसुधारणेच्या प्रयत्नातून वस्तू व सेवा कर ही कल्पना समोर आली.[२]

*** जी.एस.टी. चा प्रवास:**

[३] जगात सर्वप्रथम फ्रान्सने १९५४ मध्ये वस्तू आणि सेवा कर लागू केला. आज जगातील १६० देशात ही करप्रणाली लागू आहे. भारतात जी.एस.टी. चा प्रवास दीर्घ आहे. सन २००० साली तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजेपेयी यांच्या कारकिर्दीत जी.एस.टी. ची संकल्पना पुढे आली; आणि प.बंगालचे अर्थमंत्री असिम दासगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जी.एस.टी. प्रारूपाविषयी समिती नेमण्यात आली. २००३ मध्ये वाजपेयी सरकारने विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली कर सुधारणा विषयक कार्यदलाची स्थापना केली. २८ फेब्रुवारी २००६ रोजी तत्कालीन अर्थमंत्री पी. चिदबंरम यांनी २००६-२००७ च्या अर्थसंकल्पात जाहिर केले की, १ एप्रील २०१० पासून जी. एस.टी. लागू करण्यात येईल. जी.एस.टी. साठी घटनात्मक दुरूस्तीची आवश्यकता असल्याने दीर्घकाळ राजकीय मतैक्य होत नव्हते. मोदीचे सरकार सत्तेत आल्यानंतर जी.एस.टी. च्या अमलबजावणीसाठी वेगाने घडामोडी घडत गेल्या. लोकसभेत १९ डिसेंबर २०१४ रोजी १२२ वी घटना दुरूस्ती विधेयक मांडण्यात आले, आणि मे २०१५ मध्ये लोकसभेत हे विधेयक संमत झाले. राज्यसभेत हे विधेयक मांडल्यानंतर १४ मे २०१५ रोजी राज्यसभा व लोकसभेच्या संयुक्त निवड समिती समोर मांडण्यात आले. या समितीने २२ जुलै २०१५ रोजी आपला अहवाल दिला. मतैक्यानंतर सुधारीत घटना दुरूस्ती विधेयक १ ऑगस्ट २०१६ रोजी मांडण्यात आले. हे विधेयक ३ ऑगस्ट २०१६ रोजी समंत करण्यात आले, तर लोकसभेत ८ ऑगस्ट २०१६ रोजी समंत करण्यात आले. राष्ट्रपतीच्या मंजुरीनंतर ८ सप्टेबंर २०१६ रोजी राज्यघटनेत दुरूस्ती करून कायदा २०१६ करण्यात आला. राज्यघटनेतील दुरूस्तीनंतर **वस्तू आणि सेवा कराची** देशभर अमलबजावणी करण्याचा मार्ग मोकळा झाला.[३]

[४]१ जुलै २०१७ पासून संपूर्ण देशात वस्तू आणि सेवा कर लागू करण्यात आला. या कराद्वारे संपूर्ण देशाला एका बाजारपेठेखाली आणण्यात येत असून, त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला नवसामर्थ्य प्राप्त होईल ; असा विश्वास सरकारतर्फे व्यक्त करण्यात आला. नव्या वस्तू व सेवा करात केंद्र आणि राज्य सरकारचे १७ कर आणि इतर २२ उपकर एकाच करामध्ये अंतर्भूत करण्यात आले आहेत.[४]

*** <u>वस्तू व सेवा कराचे स्वरूप</u>:**

[५]वस्तू व सेवा कर पूर्वीच्या अनेक केंद्रीय व राज्य अप्रत्यक्ष कराच्या ऐवजी संपूर्ण राष्ट्रात येणारा एकच अप्रत्यक्ष कर आहे. हा कर उत्पादनावर नाही. ज्या क्षणाला त्याचे रूपांतर पुरवठयात (खरेदी - विक्री) होते, त्या पुरवठयावर आहे. प्रत्येक टप्यावर होणाऱ्या मुल्यवर्धनावर हा कर आहे. तथपी, प्रत्येक पुढच्या टप्प्यावर, पूर्वीच्या टप्प्यावर आकारलेल्या करासाठी सूट आहे. प्रत्यक्ष करभार अंतिम ग्राहकाने सोसावा हे अपेक्षित आहे. बदलत्या अर्थव्यवस्थेत उत्पादन व वाटप व्यवस्थेत वस्तू बरोबरच अनेक सेवांचा वापर होतो. सध्याच्या कर व्यवस्थेत प्रत्यक्ष व्यवहार मूल्याचे वस्तूमुल्य व सेवामूल्य स्वतंत्रपणे लक्षात घेणे कठीण जाते. त्यामुळे कर प्रतिपूर्ती करणे अवघड होते. या अडचणतून बाहेर पडण्यासाठी समन्वित व एकात्मिक वस्तू व सेवा कर आदर्श ठरतो. परिणामी संपूर्ण स्वतंत्र देशाची एक सलग बाजारपेठ होणे शक्य आहे. वस्तू व सेवा कराचे स्वरूप त्रिस्तरीय आहे.

१) केन्द्रीय वस्तू व सेवा कर - सी जी एस टी
२) राज्य वस्तू व सेवा कर - एस जी एस टी (यामध्ये केंद्र शासित प्रदेशांचाही समावेश)
३) आंतरराज्य वस्तू व सेवा कर - आय जी एस टी [५]

*** वस्तू व सेवा कराचे दरनिश्चिती:**

[६]भारतातील जी एस टी परिषदेने बाजारपेठेमध्ये सध्या कर आकारण्याच्या परीघामध्ये असलेल्या १२०० वस्तू व ५०० सेवांचा अभ्यास करून कर आकारणीचे शुन्य टक्के, ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के, २८ टक्के असे पाच वर्गात वर्गीकरण करण्यात आले आहे. अन्नधान्य , जीवनरक्षक औषधे याचा समावेश शुन्याधिरीत असे नामकरण केले आहे. ५ टक्केच्या वर्गामध्ये सर्वसाधारण वापरात असणाऱ्या वस्तू व सेवांचा समावेश आहे, तर बाजारात मोठया प्रमाणात उलाढाल होणाऱ्या ८१ टक्के वस्तूचे दर १२ टक्के व १८ टक्के स्लॅबमध्ये आहेत. या गटामध्ये ग्राहकउपयोगी वस्तू व सेवांचा मोठया प्रमाणात समावेश आहे. उच्चत्तम दर २८ टक्के गटामध्ये आलिशान गाडया, तंबाखूजन्य उत्पादने, शीतपेये यांचा समावेश आहे. याशिवाय सेस या नावाने आणखी एक गट तयार करण्यात आला आहे. त्याचे अधिकार जीएसटी परिषदेकडे ठेवण्यात आले आहेत. याशिवाय सोने व सोन्याचे दागिने यावर ३ टक्के, हिरे व हिऱ्याचे दागिने यावर १.२ टक्के कर आकाराण्याचा निर्णय झालेला आहे. [६]

*** जीएसटीची प्रमुख वैशिष्टये:**

१) [७]जीएसटीचा प्रादेशिक विस्तार संपूर्ण देशभर असून त्यात जम्मू आणि काश्मीरचाही समावेश आहे.
२) जीएसटी हा वस्तू व सेवेच्या पुरवठयावर लागू आहे जे पूर्वी उत्पादन व विक्रीवर होते.
३) उपभोगावर आधारीत कररचनेच्या तत्वावर आधारीत आहे. जे वस्तू व सेवांचा उपभोग घेतला जातो त्यावर आधारीत कर लावला जातो.
४) सीजीएसटी आणि एसजीएसटी / युटीजीएसटी या दोन्हीसाठी सवलतीची एकच सामायिक कमाल मर्यादा २० लाख रूपयाची आहे. (जम्मू - काश्मीर वगळून)
५) सेझसाठी निर्यातपुरवठा शुन्य दराने.
६) कर अदा करण्यासाठी करदात्याला कर भरण्याच्या विविध पध्दती उपलब्ध असून त्यात इंटरनेट, बँकिंग, डेबीट/क्रेडिट कार्ड, NEFT आणि RTGS यांचा समावेश आहे.
७) भारतासाठी एकच सामायिक बाजापेठ निर्माण करण्यासाठी मदत होणार असून परदेशी गुंतवणूकीस चालना मिळणार आहे.
८) नोंदणी,परतावा, विवरणपत्र करांची रक्कम अदा करणे यासारख्या विविध प्रक्रीयासाठी सुलभ आणि स्वयंचलित कामकाज.
९) माल आयात करणे व आयात सेवासाठी आतंरराज्य पुरवठयाप्रमाणे समजले जाणार असून त्यावर सीमाशुल्क व्यतिरक्ति आयजीएसटी आकारला जाणार आहे.
१०) सीजीएसटी, एसजीएसटी, युटीजीएसटी आणि आयजीएसटी केंद्र व राज्य करकार जीएसटी मंडळाच्या छताखाली या दोघानाही मान्य केलेल्या दरावर आकारले जातील.
११) सर्व संवाद हा सामायिक जीएसटीएन या पोर्टलच्या माध्यमातून होणार त्यामुळे करदाता व कर प्रशासन यांच्यात किमान संवादाची गरज. [७]
१२) प्रत्येक करदात्याला पॅन सलग्न टॅक्स पेयर आयडेंटीफिकेशन नंबर (TIN) दिला जाईल
१३) करदात्यांना कर भरणा करण्यासाठी केंद्र व राज्य सरकाराना समान फॉर्म मध्येच, ठराविक काळाने कर प्रपत्र भरावे लागेल.

*** समारोप:**

पूर्वीच्या केंद्र व राज्य सरकारच्या विविध कराऐवजी जीएसटी या नवीन करप्रणालीमुळे विशिष्ट वस्तू व सेवावर संपूर्ण देशभर एकच कर आकारला जाणार आहे. ही नवीन कर प्रणाली गुंतवणुक वाढविण्यास पोषक आहे. तसेच करादात्यांची संख्या वाढून सरकारी उत्पन्नात वाढ होण्यास हातभार लावणारी आहे. व्यापाऱ्यांच्या खरेदी विक्रीच्या सर्व व्यवहारांची नोंद ऑनलाईन असल्यामुळे अधिक उत्पन्न व कमी खर्चाची ही कर प्रणाली आहे. या कर प्रणालीमुळे करचूकवेगिरीला मोठया प्रमाणात आळा घालण्यास मदत होणार आहे. जीएसटीमुळे वस्तू अगर सेवा पुरवठयाच्या सर्व व्यवहारावर केंद्र आणि राज्य दोघेही कर आकारू शकतील. प्रवेशकर, खरेदी विक्री, पुर्नविक्री, मनोरंजन, ऐषआराम यावर कर लावण्याचे हक्क राज्य गमावून बसणार आहेत. त्याच बरोबर सर्व प्रकारच्या सेवावर कर आकारण्याचे अधिकर मिळणार आहेत.